महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन निर्णय क्रमांक : एसएफएस-२०१९/प्र.क्र.१०/एसएम-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ५ मार्च २०१९.

**प्रस्तावना-**

१. भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज, कात्रज आंबेगाव रोड, पुणे या शाळेस मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर शाळेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज, कात्रज आंबेगाव रोड, पुणे ही नवीन शाळा (इयत्ता १ली ते १२वी, प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इंग्रजी माध्यम, राज्य मंडळ) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

**२.२ अटी व शर्ती –**

(१) सदर संस्थेने रुपये २५,०००/- इतक्या रकमेच्या नवीन चलन व संस्थेच्या नावाने एकुण ४० आर जमिनीबाबतच्या ७/१२ चा अद्ययावत उतारा / खरेदी खत / नोंदणीकृत बक्षीस पत्र किंवा जमिन भाडेकरार (लिज) असल्यास ३० वर्ष कालावधीच्या नोंदणीकृत भाडेकराराची प्रत संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत पूर्तता न केल्यास शाळेची मान्यता आपोआपच रद्द समजण्यात येईल.

२) सदर शाळेने बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणाऱ्या सर्व नियमांची/तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३) शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम २००९** मधील तरतुदींची पूर्तता करून सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरू करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासुन **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करीता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून

अशा परीक्षांच्या आत शाळा सुरू करणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची परवानगी आपोआपच रद्दबातल होईल.

४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे पालन, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

५) संबंधित शिक्षण अधिकारी यांनी अधि[illegible] प्रत्यक्ष पाहणी करावी व तद्नंतरच यु.ए मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

६) संस्थेने शाळा परवानगी साठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये नियमात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

७) **यु-डायस डाटा**:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, ***"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा"*** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करून यु-डायस क्रमांक प्राप्त करून घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहिती करीता **"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहिर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसांत कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

०२.०५.२०१३

(रा. वि. कुडले)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे

) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे

विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. पुणे

निवडनस्ती (एसएम-२).